लोकसत्ता, 25/10/2010 p.5

# खगोलशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये भारताला दोन सुवर्णपदके

मुंबई, २४ ऑक्टोबर / पीटीआय

युक्रेनमध्ये घेण्यात आलेल्या पंधराव्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये भारताला दोन सुवर्ण व एक रजत पदक मिळाले आहे. तीन भारतीय विद्यार्थी त्यात सहभागी झाले होते, भारतीय खगोलशास्त्र ऑलिम्पियाड कार्यक्रमाचे समन्वयक डॉ.अनिकेत सुळे यांनी सांगितले, की शरद मिराणी (अहमदाबाद) आर.भारद्वाज (हैदराबाद) यांना सुवर्ण पदके मिळाली असून नाशिकचा प्रीतिश पाटील याला रजत पदक मिळाले आहे.